वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# वाल्मिक कराड आता ६ महिने तुरुंगातच?

## जामीन मिळणं कठीण, कोर्टाने सुनावली १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

बीड, (दिव्य न्युज):- संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मीक कराडची रवानगी पोलीस कोठडीतून न्यायालयीन कोठडीत करण्यात आलीय. बीड जिल्हा विशेष न्यायालयाने कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून त्याला तुरुंगात रहावे लागणार आहे. कराडने ३१ डिसेंबरला सीआयडीसमोर शरणागती पत्करली होती. तेव्हापासून तो पोलिसांच्या ताब्यात आहे. सुरुवातीला त्याला खंडणीच्या गुन्ह्यात अटक झाली होती. मात्र नंतर संतोष देशमुख यांच्या हत्येच्या गुन्ह्यातही कराडला आरोपी करण्यात आलं. आता या प्रकरणी कराडला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलीय.

न्यायालयीन कोठडी सुनावली असली तरी जेव्हा सीआयडीला तपासासाठी ▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

# धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा

## वाल्मिक कराड एवढा मोठाही नाही, मंत्रीपदामुळे संरक्षण-आ.संदीप क्षीरसागर





बीड, (दिव्य न्युज):- बीडचे शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा विषय लावून धरला आहे. वाल्मिक कराडच मुख्य मास्टरमाइंड असल्याचा त्यांचा आरोप असून चौकशी पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी त्यांची मागणी आहे. या हत्या प्रकरणातील अन्य आरोपींसह वाल्मिक कराड फिरत असल्याच सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. त्यावर संदीप क्षीरसागर बोलले.

मी पहिल्या दिवसापासून सांगतोय, वाल्मिक कराडच मास्टरमाइंड आहे. खंडणीच्या गुन्ह्यामुळे हा गुन्हा झालाय. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसतय, लिंक आहे हे. वाल्मिक कराड एवढा मोठाही नाही. मंत्रिपदामुळे संरक्षण मिळतय. त्यांनीच म्हटलय माझे निकटवर्तीय आहेत. या सर्व प्रकरणात धस अण्णा बोललते, ती वस्तुस्थिती आहे असं ▶▶ पान २ वर

# चेतना कळसे प्रकरण काय? कधी झाला होता मृत्यू?

## परळीला जाऊन घेणार कुटुंबियांची भेट-आ.सुरेश धस



बीड, (दिव्य न्युज):- वाल्मिक कराड आणि त्याच्या गँगचा एक व्हिडीओ मंगळवारी समोर आला. तपास यंत्रणांसाठी हा सर्वात मोठा पुरावा समजला जातोय. त्यामुळे वाल्मिक कराडचे पाय आणखीनच खोलात गेले आहेत. व्हिडीओ बाहेर आल्यानंतर भाजप आमदार सुरेश धस यांनी माध्यमांशी संवाद साधून आजवर झालेल्या खुनांचा पाढा वाचला.

सुरेश धस म्हणाले की, २२ ऑक्टोबर रोजी महादेव मुंडे नावाच्या व्यक्तीचा खून झाला होता. परळी तहसीलसमोर त्यांचं प्रेत सापडलं होतं. त्यावेळी सानप नावाच्या पोलिस निरीक्षकांनी या खुनाचा छडा लावला. मात्र जेव्हा आरोपी अटक करण्याची वेळ आली तेव्हा आकाने सांगितलं की आरोपी पकडायचे नाही. ▶▶ पान २ वर

# प्रधानमंत्री आवास योजनेसाठी इच्छुकांनी ऑनलाईन नोंदणी करावी-पटेल, नाईकवाडे





बीड , (दिव्य न्युज):-नगर परिषदेकडून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)२.० राबवण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेतंर्गत इच्छुक लाभार्थ्यांनी नवीन घरकुल मंजुरीसाठी वेब पोर्टलवर ऑनलाईन नाव नोंदणी तत्काळ करावी असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना नाईकवाडे यांनी म्हटले आहे की, बीड नगर परिषदेकडून शहर हद्दीतील सर्व घरकुल बांधणी इच्छुक नागरिकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० राबवली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी या योजनेतंर्गत नवीन घरकुल मंजुरी करिता वेब पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी. अर्जदारासाठी पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे आहेत:- भारतामध्ये अर्जदाराचे तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे.अर्जदाराने मागील २० वर्षात कोणत्याही शासकीय घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.अर्जदार हा आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील असावा. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ४.५० लक्ष रुपये कमाल राहील. योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील. घराचे बांधकाम करण्यासाठी स्वत:च्या मालकीची जागा असावी. ▶▶ पान २ वर

# बनावट चलनी नोटांमध्ये मनिष क्षीरसागर यास अटक

## आठवले गँगचा सहभाग निश्चित, बीड शहर पोलिसांची कामगीरी



बीड , (दिव्य न्युज):- आठवले गँग सोबत सावलीसारखा राहणारा मनीष क्षिरसागर यांच्या घरामध्ये तीन महिन्यापूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत यातील प्रिंटर, बनावट चलनी नोटा, आणि सहभागी प्रमुख आरोपी तात्काळ अटक केली होते. परंतु ▶▶ पान २ वर

# कृष्णा आंधळेला पोलिसांनी वॉन्टेड घोषित केला

## पथकांना अजूनही सापडेना



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. पोलिसांची पथकांनी महाराष्ट्राच्या शेजारील राज्यात त्याचा शोध सुरू केला आहे. पण, अजूनही त्याचा पत्ता लागलेला नाही. यामुळे आता पोलिसांनी कृष्णा आंधळे याला वान्टेड घोषित केले आहे. त्याला शोधून देणाऱ्याला बक्षिस ▶▶ पान २ वर





**मुंबई : जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री.अजितदादा पवार साहेबांचे अभिनंदन केले. दादांसारखा प्रशासनावर पकड असणारा नेता पालकमंत्री झाल्यामुळे बीड जिल्ह्याचा विकास मोठ्या प्रमाणावर होईल यात शंका नाही.आज बीड चखऊ बाबत दादांशी चर्चा केली. MIDC चा विकारस व्हावा जेणेकरून बीड शहरात अधिकाधिक उद्योग यावेत व त्यातून रोजगार निर्मिती होऊन जिल्हा विकासाचा वाटेवर यावा याबाबत दादांकडे काही मागण्या केल्या. दादांनी देखील सर्व मागण्यांबाबत सकारात्मकता दाखवली आहे.**

# पुणे शहरात दुर्मिळ जीबीएस आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ

## आजाराची लक्षणे नेमकी काय?

पुणे , (दिव्य न्युज):-गेल्या २-३ वर्षांपूर्वी जगभरात कोरोना विषाणूने चांगलाच हाहाकार माजवला होता. या कोरोनाच्या महामारीमध्ये कोट्यावधी लोकांचा जीव गेला. कोरोनाच्या महाप्रलयातून गेल्या २ वर्षांत सावरत आहे तोच पुणे शहरात आता दुर्मिळ आजाराने डोकेदुखी वाढवली आहे. पुण्यात 'गुलेन बॅरी सिंड्रोम' या न्यूरोलॉजिकल आजाराचे संशयित रूग्ण आढळून आले आहेत. पुणे महानगरपालिका ▶▶ पान २ वर




# आम्हाला न्याय देऊनच भेटायला या

## देशमुख कुटुंबीयांची पंकजा मुंडेकडे मागणी

केज,(दिव्य न्युज):- पंकजा मुंडे यांचा एकदा व्हिडीओ कॉल आलेला, पण आम्हाला न्याय देऊनच भेटायला या असं त्यांना सांगितल्याची माहिती सरपंच संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी दिली. संतोष देशमुख हे भाजपचे बूथ प्रमुख होते, त्यामुळे त्यांना न्याय मिळावा अशी मागणीही पंकजा मुंडे यांच्याकडे केली असल्याचं ते म्हणाले. आतापर्यंत धनंजय मुंडे यांचा एकही कॉल आला नाही किंवा त्यांनी आम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही असंही धनंजय देशमुख यांनी सांगितलं.

संतोष देशमुखांची हत्या झाल्यानंतर त्यासंबंधित पंकजा मुंडेंनी एकदा व्हिडीओ कॉल केल्याची माहिती धनंजय देशमुखांनी दिली. त्यावेळी आम्हाला न्याय देऊनच भेटायला या असं संतोष देशमुखांच्या पत्नीने पंकजा मुंडे यांना सांगितलं. या काळात मात्र धनंजय मुंडे यांचा एकही कॉल आला नाही असंही धनंजय देशमुखांनी सांगितलं.

बीडचे पालकमंत्री अजित पवारांना मस्साजोगचे ग्रामस्थ जाब विचारणार असल्याचं धनंजय देशमुख म्हणाले. अजितदादांना मस्साजोगमध्ये बोलवायचं की बीडमध्ये त्यांची भेट घ्यायची हे ग्रामस्थ ठरवतील असंही ते म्हणाले. या प्रकरणात सरकारी वकिलाची नियुक्ती होण्यासाठी ▶▶ पान २ वर

# पीकविमा घोटाळा ५ हजार कोटींपेक्षा जास्त

## सुरेश धस यांचा दावा ; थेट कृषी मंत्र्यांनाच दिलं चॅलेंज



मुंबई, (दिव्य न्युज):- पिक विमा घोटाळा साडे तीनशे कोटीचा असल्याचं सरकारचं म्हणणं आहे. पण भाजपचेच आमदार सुरेश धस यांनी सरकारचं हे म्हणणं फेटाळून लावलं आहे. पिक विमा योजनेचा घोटाळा हा पाच हजार कोटीच्या वर आहे, असा दावा करतानाच या मुद्द्यावर माझ्याशी कुठेही चर्चा करायला या. मी तयार आहे, असं आव्हानच सुरेश धस यांनी थेट राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना दिलं आहे. त्यामुळे सुरेश धस आणि माणिकराव कोकाटे यांच्यात या मुद्द्यावरून जुंपण्याची शक्यता अधिक आहे.

भाजप आमदार सुरेश धस मीडियाशी संवाद साधत होते. तुम्ही पिक विमा कर्जाच्या घोटाळ्यावर भाष्य केलं. त्यामुळे सव्वा चार लाख कर्ज अवैध असल्याचं समोर आलं. सरकारचं मोठं नुकसान होताना वाचलं, असं सुरेश धस यांना विचारण्यात आलं. त्यावर त्यांनी हा मुद्दाच फेटाळून लावला. सरकारचं नुकसान वाचलं नाही. तुम्ही थोडं मागे जाऊन पाहा. काही शेतकऱ्यांनी कर्जाचे पैसे उचलून नेले आहेत. त्यामुळे शासनाचे पैसे वाचले असं म्हणता येत नाही. शासनाने फक्त साडेतीनशे कोटी रुपयांचा घोटाळा दाखवला. पण माझं मत आहे की हा भ्रष्टाचार पाच हजार कोटीच्यावर जाणार आहे, असा दावा सुरेश धस यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या परदेशात आहेत. ते परदेशातून आल्यावर मी त्यांना पिक विमा कर्जातील घोळाबाबतचं पत्र देणार आहे. त्यावर काय कारवाई करायची तो अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलंय की सखोल चौकशी नेमू. सखोल चौकशी नेमा. कमिशनर किंवा सचिवाच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी धस यांनी केली आहे.

सेंटर एकाच तालुक्यात कसे?

या घोटाळ्यातील सीएससी सेंटरवाले प्यादे आहेत. हे सेंटर एकाच तालुक्यात कसे ▶▶ पान २ वर

# शिंदेंची सेना फुटीच्या मार्गावर ?

## आग लागल्याशिवाय धूर निघणार नाही! शरद पवारांच्या खासदाराचे सूचक वक्तव्य

मुंबई, (दिव्य न्युज):- महायुतीचे सरकार आल्यापासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुरुवातीला मुख्यमंत्रिपदावरून नंतर मंत्रिपदाच्या वाटपावरून आणि आत्ता पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून नाराज असल्याच्या बातम्या सातत्याने येत आहेत.

एकीकडे शिंदे नाराज असल्याचा सांगण्यात येत असतानाच दुसरीकडे मंत्री उदय सामंत हे वीस आमदारांसह भाजपसोबत जाणार असल्याचा गौप्यस्फोट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेमध्ये फूट पडणार का? असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. या पार्श्वभूमी वर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी याबाबत वक्तव्य केला आहे.पुण्यामध्ये अमोल कोल्हे यांनी विविध विषयांवर ती पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावर गेले आहेत. महाराष्ट्रात येणाऱ्या गुंतवणुकीच्या संदर्भात कौतुक झालं पाहिजे. मात्र येणारी गुंतवणूक कागदावर नको ती प्रत्येक्षात यावी, अशी अपेक्षा असल्याचे कोल्हे म्हणाले.

पहाटेच्या शपथविधीबाबत छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांनी केलेल्या वक्तव्याबाबत प्रतिक्रिया देताना अमोल कोल्हे म्हणाले, काही नेत्यांकडून शिळ्या कढीला ऊत आणण्याच्या प्रयत्न होत आहे. त्या शपथविधीबाबतची वक्तव्य ही मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर आणि आरोप झाल्यानंतर येत असतील तर याची कारण मीमांसा करणं आवश्यक आहे. मात्र जुन्या गोष्टी उकरून उतरून यातून साध्य काय होणार आहे,

सातत्याने महायुती सरकारमधील नाराजीच्या बातम्या समोर येत आहेत. याबाबत बोलताना अमोल कोल्हे म्हणाले, राज्य सरकार अस्तित्व आल्यानंतर सुद्धा सरकार सुरळीत काम करतय का? सर्वांच्या मनात प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. पालकमंत्री निवडीसाठी लागलेला वेळ, त्यातून नाराजी, नेते नॉट रिचेबल असणं यावरून हे सरकार चे योग्य दिशेने चाललय असं वाटत नाही. सरकार मधील हाताच्या बोटावर मोजण्याइतके नेते सक्रिय आहेत. त्यामुळे महाराष्ट्रासमोरील प्रश्न सोडवण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न होतात आहेत असं दिसत नसल्याची टीका कोल्हे यांनी केली.

शिंदेंच्या शिवसेनेमध्ये फूट पडून उदय सामंत यांच्यासह २० आमदार भाजपसोबत जाण्याच्या तयारीत आल्याचे विधान संजय राऊत यांनी केले आहे. अमोल कोल्हे म्हणाले, सध्या पक्ष फुटीबाबत होत असलेल्या चर्चा आणि मुख्यमंत्र्यांच्या नाराजीबाबत येत असलेल्या बातम्या यामुळे कुठेतरी आग असल्याशिवाय धूर येत असावा, त्यामुळे कुठेतरी शिंदेंच्या सेनेत सारं काही आलबेल आहे का हे पाहणं महत्त्वाचं असल्याचं कोल्हे म्हणाले.

# धनंजय मुंडेंच्या अडचणीत वाढ ? ; कृषिमंत्र्यांची धक्कादायक कबुली

बीड , (दिव्य न्युज):- २०२४ च्या खरीप हंगामात राबवण्यात आलेल्या एक रुपयात पीकविमा योजनेत घोळ झाल्याची कबुली राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. मात्र, ही योजना बंद न करता त्यात सुधारणा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.योजनेत आमूलाग्र बदल : कृषिमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, योजनेमध्ये आम्हाला काही बदल करायचे आहेत. यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून ते शेतकऱ्यांकडून अभिप्राय घेतील. यानंतर योजनेत काही आमूलाग्र बदल होतील.

महा-ई-सेवा केंद्रांवर कारवाई :राज्यातील पाच ते सहा जिल्ह्यात काही लोकांनी मशीद, मंदिर, एनए प्लॉट किंवा शासकीय जमिनीवर विमा उतरवल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे या सर्व महा-ई-सेवा केंद्रांवर कारवाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही कोकाटे यांनी सांगितले.

९६ महा-ई-सेवा केंद्रांवर काही लोकांचे बोगस सातबारा (७/१२) उतारे काढण्यात आले, असेही कोकाटे यांनी कबूल केले. तसेच, जवळपास सव्वाचार लाख अर्ज रद्द केल्याने येथे कोणत्याही प्रकारचे बोगस काम झालेले नाही. त्यामुळे राज्य सरकारचा निधी वाचला, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, आ. विजय वडेट्टीवार यांनी या योजनेत ३५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. राज्यातील एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्याची शिफारस सरकारला करण्यात आली आहे. त्यामुळे कृषी खात्यात भ्रष्टाचाराचा हा बीड पॅटर्न झाला असून, धनंजय मुंडे कृषिमंत्री असताना त्यांनी घेतलेल्या निर्णयाची चौकशी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

उपग्रहाद्वारे पीकविम्याच्या बाबतीत पारदर्शकता कशी येईल, यासंदर्भात सरकार गांभीर्याने विचार करत आहे, असे कृषीमंत्री कोकाटे यांनी सांगितले.ॲग्रिस्टॅक योजनेतून शेतकऱ्यांना युनिक आयडी कार्ड देणार आहोत. त्यानंतर आधार कार्डशी आणि महसूल विभागाशी शेतकऱ्यांचे खाते जोडले जाईल, अशी माहितीही कोकाटे यांनी दिली.वडेट्टीवार म्हणाले, महायुती सरकारने एक रुपयात पीक विमा ही योजना आणली. त्यावरून आपली पाठ थोपटून बीड पॅटर्नचागवगवा केला होता. पण या योजनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिति नेमली होती. या समितीने राज्य सरकारला ही योजना बंद करण्याची शिफारस केली असल्याचे समजते. या योजनेत शेतकऱ्यांच्या नावे बोगस अर्ज केल्याची प्रकरणे समोर आल्यानंतर ही शिफारस केली गेली.

पान ४ वरून

### महाराष्ट्राचा हरियाणा होतो

आणि बेदम मारण्यात आली. त्याची हाडं फ्रॅक्चर केली. जागीच तो बेशुद्ध झाला. पोलीस त्याला हॉस्पिटलला घेऊन गेले नाहीत. अखेर नातेवाईकांनी रुग्णालय गाठले. दोन दिवस अर्धवट बेशुद्ध होता. ९ जानेवारीला त्याने प्राण सोडले. बीडच्या बॅकग्राऊंडवर हे प्रकरण पहिले तर धनगर विरुद्ध मराठा असेच आहे असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

बाईकच्या सायलेन्सरने मारले

आम्ही जाऊन भेट दिली आहे. वातावरण शांत राहील म्हणून आम्ही सांगितले. तपासात पोलिसांनी ज्या उणीवा सोडल्या त्या आम्ही दाखवून दिल्या आहेत. जो आरोपी पकडला ते नमूद केले आहे माऊली सूत आहे त्याला एफआयआरनंतर २ दिवस पाहीले नाही. त्याचे कपडे कुठे ठेवले ? कसे ठेवले? हे पाहिलं आणि आपण तेथे गेल्यावर चौकशी सुरु झाली. चिट्टी ताब्यात घ्यायला पाहीजे होती. फिंगर प्रिंट तपासली पाहिजे होती. कोणी आय व्हीटनेस आहे त्याचा ही शोध घेतला नाही. बाईकच्या सायलेन्सरने मारले आहे. डॉक्टरांचं स्टेटमेंट अद्याप आलेलं नाही. दुर्दैव म्हणजे तो बेशुद्धावस्थेत असताना त्याला डिस्चार्ज दिला गेला.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या

काकडे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर लंगे. सचिव पदी गंगाभीष्म अंडील सर,कोषाध्यक्षपदी शंकर जाधव, इत्यादीच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी शाल पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या तसेच या निवडीबद्धल जिल्हा भरातुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे पुढील कार्यासाठी शुभेच्छा देऊन सत्कार केला..

### महाराष्ट्र श्री मास्टर्स शरीर

सिद्दीकी यांना स्पर्धेचे यशासाठी मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन चे कार्य अध्यक्ष आमदार मा. विजयसिंह पंडित राजे, जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. योगेश भय्या क्षीरसागर, ड. शेख शफिक भाऊ , श्री.अविनाश नाईकवाडे, श्री.विक्रांत हजारी, डॉ.सय्यद मसिह यांनी शुभेच्छा दिल्या.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त

२३,२४,२५ रोजी ११ वा. होणार आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुलतानपूर ( माळेवाडी ), किट्टीआडगाव विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ होणार आहे. शिक्षणाची गती वाढवून प्रत्येक मुलाला उज्ज्वल भविष्य घडवण्याचा हा प्रयत्न असल्याचे दिपक मधुकर माने यांनी सांगितले. मी स्वतः खूप संघर्षातून इथे पोहोचलो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी मला नेहमी प्रेरणा दिली आहे. शिक्षण हाच विकासाचा मुख्य मार्ग आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राहण्यासाठी आवश्यक साधने देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे - दीपक माने

या कार्यक्रमामध्ये स्थानिक नागरिक, पालक व शिक्षकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

### वाल्मिक कराड

कराडची गरज असेल तेव्हा ते चौकशी करू शकतात. यासाठी सीआयडीला न्यायालयाची परवानगी घ्यावी लागेल. आवश्यकता भासली तर सीआयडीकडून कराडच्या पोलीस कोठडीची मागणीही केली जाऊ शकते. यामुळे कराडच्या अडचणीत आता वाढ झाली आहे.

दरम्यान, वाल्मीक कराडला आता सहा महिने जामीन मिळणं कठीण आहे. वाल्मीक कराडचे वकील जामिनासाठी न्यायालयात गेले तरी त्याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई केल्यानं १८० दिवस जामीन मिळत नाही. यामुळे वाल्मीक कराडला आता पुढचे सहा महिने तुरुंगातच रहावं लागण्याची दाट शक्यता आहे.

सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे म्हणाले की, एसआयटीने वाल्मीक कराडची न्यायालयीन कोठडी मागताना कोणत्यावेळी कोठडीत घ्यायचं याचा अधिकार अबाधित ठेवलाय. जरी त्याला न्यायालयीन कोठडी मिळाली तरी एसआयटीला केव्हाही पोलीस कोठडी मिळू शकते. कोठडीचा अधिकारी अबाधित ठेवूनच एसआयटीने न्यायालयीन कोठडी घेतलीय.

धनंजय मुंडे यांनी वाल्मीक कराडबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देण्यास नकार दिला. तसंच त्यांनी यावर मला प्रश्न विचारू नका असंही म्हटलं. संतोष देशमुख यांचा खून ज्यांनी कुणी केला आहे. निर्घृणपणे ज्यांनी ही हत्या केलीय त्यांना फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून तात्काळ फाशी द्या असंही मंत्री धनंजय मुंडे म्हणालेत.

### चेतना कळसे प्रकरण

सानप प्रामाणिक अधिकारी होते त्यांनी तपास लावला, मात्र त्यांच्यावर दबाव टाकला आता त्यांची बदली आहे. पण खुनाचा तपास लागला नाही. यातले खुनी आकाच्या

मुलासोबत राजरोस फिरत आहेत, या घटनेत दुसरेच आरोपी यात अटक करण्यात आले.

धस म्हणाले की, परळीत जेवढे खून झाले आहेत, त्या सगळ्यांच्या कुटुंबियांना मी भेटणार आहे. चेतना कळसेपासून ते संतोष देशमुखांपर्यंत ही मालिका आहे. महादेव मुंडेंच्याही कुटुंबियांची मी भेट घेणार आहे. केवळ संगीत डिघोळेच नाही तर त्याही पूर्वी चेतना कळसे नावाच्या महिलेचा मृत्यू झाल्याचं धसांच्या बोलण्यातून स्पष्ट होतंय.

चेतना कळसेंचा मृत्यू झाला होता, हे सुरेश धस यांच्या विधानावरुन स्पष्ट होत आहे. मात्र चेतना कळसे कोण? असा प्रश्न पडतोय. आजच्या पिढीला याबद्दल काहीही माहिती नाही. काही लोकांशी संपर्क साधला असता त्यांनी केवळ नाव ऐकल्याचं सांगितलं. साधारण पंचवीस ते तीस वर्षांपूर्वी चेतना कळसेचा मृत्यू झाला होता. सुरेश धस यांनी हे नाव पहिल्यांदाच घेतल्याने चर्चा सुरु झाली आहे. अद्याप याबाबत अधिक माहिती मिळालेली नाही.

### धनंजय मुंडेंनी राजीनाम

संदीप क्षीरसागर म्हणाले.

पोलिसांना सहआरोपी बनवाव का?

या प्रकरणात पोलिसांना सहआरोपी बनवाव का? अशी तुमची मागणी आहे का? यावर संदीप क्षीरसागर म्हणाले की, प्रशासन मंत्र्यांच्या दबावाखाली असतं. बदलले. वरुन निर्णय झाला. सरकार म्हणून त्यांनी - लींळेप घेतली. त्यांनी राजीनामा दिला, तर प्रशासन मोकळ्या श्वासाने काम करेल. पोलिसांनी ठरवलं, तर मूळ कारण समोर येईल

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आतापर्यंत सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, जयराम चाटे, विष्णू चाटे. प्रतिख घुले, महेश केदार तुरुंगात आहेत. त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाईही करण्यात आली आहे. वाल्मिक कराड याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या हत्या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा आरोपी कृष्णा आंधळे हा मागच्या महिनाभरापासून सापडत नाहीय. त्याला अखेर फरार घोषित करण्यात आलं आहे.

### प्रधानमंत्री आवार

लाभार्थी कुटुंबामध्ये पती-पत्नी व अविवाहित मुले / मुली (वय वर्षे १८ खालील मुले / मुली) यांचा समावेश असावा.स्वत:च्या नावाने आधारलिंक असलेले बँक खाते असावे.जात प्रमाणपत्र (एससी,एसटी,ओबीसी लाभार्थ्यांसाठी आवश्यक आहे) या पात्रताधारक लाभार्थ्यासाठी योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित संकेतस्थळावर नोंदणी करावी असे आवाहनही नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारूक पटेल यांनी केले आहे.

अर्जदाराचे आधार कार्ड (मोबाईल नंबर लिंक असलेले), अर्जदार यांचे कुटुंबा मधील सर्व सदस्यांचे आधार कार्ड (पती/पत्नी व मुले) उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे),जात प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले)जागेचे पुरावे (पी.टी.आर, पी. आर. कार्ड, ७/१२ किंवा खरेदीखत) अर्जदार यांचे आई व वडिलांचे आधारकार्ड (हयात नसल्यास मृत्यू प्रमाणपत्र) पी. एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी. एम. विश्वकर्मा इत्यादी योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत आवश्यक आहे.संपुर्ण कागदपत्राच्या मूळ प्रतीसह ऑनलाईन नोंदणी करुन प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)२.० योजनेमध्ये लाभ घेण्याचे आवाहन अमर नाईकवाडे व फारुख पटेल यांनी केले आहे.

### कृष्णा आंधळेला

जाहीर करण्यात आले आहे.

तर दुसरीकडे खंडणी प्रकरणातील संशयीत आरोपी वाल्मीक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. कालपासून वाल्मीक कराड याची तब्येत बिघडल्याचे सांगण्यात येत आहे. त्याला सर्दी आणि ताप आला आहे. यामुळे आता कोर्टाने उझ-झ मशिन वापरण्यास कोर्टाने मंजूरी दिली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आता तपासाला आणखी वेग आला आहे.

सीआयडीसह आता एसआयटीही तपास करत आहे. काही दिवसापूर्वी एसआयटीमधील अधिकारी बदलण्यात आले. काही दिवसापूर्वी वाल्मीक कराड विरोधात मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, आता आज कोर्टाने वाल्मीक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

वाल्मीक कराड याला व्हीसीद्वारे कोर्टासमोर हजर करण्यापूर्वी डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. यावेळी त्याला सर्दी आणि ताप असल्याचे समोर आले.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या झाली. ही हत्या सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, या आरोपींना अपहरण करुन हत्या केली. ही हत्या होऊन एक महिना उलटला आहे. पण अजूनही कृष्णा आंधळे फरार आहे. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. सर्व आरोपींवर मकोका लावला होता. परंतु, खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड याचादेखील यात सहभाग असल्याचा आरोप करत देशमुख कुटुंबाने आंदोलन केले होते. त्यानंतर कट रचल्याचा ठपका ठेवत कराडवरदेखील मकोका लावण्यात आला. एकूण नऊ आरोपींवर मकोका लागला असून, कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. मकोका लावताना सीआयडीने सुदर्शन घुले याला गँगचा प्रमुख केले आहे. कराड हा सदस्य आहे.

### आम्हाला न्याय

वेळ लागत असल्याचं धनंजय देशमुख म्हणाले. या प्रकरणात ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली.

संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांना भेटायला का गेला नाहीत असा प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारण्यात आला होता. त्यावर त्या म्हणाल्या होत्या की, संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांना भेटायला जाण्यापूर्वी त्यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संवाद साधला. त्यावेळी मस्साजोगची परिस्थिती ठिक नाही, त्यामुळे तुम्ही आता भेटायला येऊ नका असं सांगण्यात आलं होतं. त्यामुळे आपण त्या ठिकाणी गेले नाही. ज्यावेळी देशमुख कुटुंबीय म्हणतील त्यावेळी त्यांना भेटायला जाणार. माझ्यासाठी त्या कुटुंबाला भेटायला जाण्यापेक्षा त्यांना न्याय मिळणं अधिक महत्त्वाचं आहे.

वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात कराडवर मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. व्हीसीद्वारे वाल्मिक कराडची सुनावणी पूर्ण झाली. चौकशी पूर्ण झाल्याने सीआयडीने कोठडीमध्ये वाढ मागितली नाही. खंडणी आणि मकोका या दोन्ही गुन्ह्यात कराडला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यामुळे वाल्मिक कराडला आता जामीन मिळण्याची शक्यता देखील वाढली आहे.

### पिक विमा

जातात? सर्व शेतकरी दोषी आहेत असं म्हणत नाही. ठरावीक शेतकरी दोषी आहेत. आठ जिल्ह्यात पीक विमा भरणारे शेतकरी एक शेतकरी असू शकतो का?, असा सवाल सुरेश धस यांनी केला.

तुम्ही आताच चार्ज घेतला

सुरेश धस यांचे आरोप राजकीय आहेत, असं कृषी मंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले होते. त्यावरही त्यांनी भाष्य केलं. माझे आरोप राजकीय नाहीत. माझं कृषीमंत्र्यांना चॅलेंज आहे. टीव्हीवर किंवा कुठेही चर्चेला या. पाच हजार कोटींच्यावरचा हा घोटाळा कसा झाला ते सांगतो. हा साडे तीनशे कोटीचाच घोटाळा नाही. टोटल कागदपत्रे देतो. पाच हजार कोटीचा घोटाळा आहे. तुम्ही आता कृषीमंत्रीपदाचा चार्ज घेतला. तुम्हाला माहीत नसेल, असा चिमटाही त्यांनी काढला.

चौकट

बोगस पीक विमा रद्द, कृषी विभागाची धडक कारवाई

या घडीची सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. बोगस पिक विमा उतरवलेल्या शेतकर्यांचा विमा रद्द करण्याची सूचना कृषी विभागाने दिली आहे. खरीप हंगामात शेतकर्यांनी पीक लागवड न करता पिक विमा उतरवल्याचा निदर्शनास आले होते. यामध्ये कांदा उत्पादक शेतकर्यांचा आकडा सर्वाधिक मोठा होता. नाशिक जिल्ह्यात ५१७२ शेतकऱ्यांनी ३६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरला होता.

५१७२ शेतकर्यांवर ठपका

बोगस पीक विमा प्रकरणात कृषी विभागाने नाशिक जिल्ह्यातील ५१७२ शेतकर्यांवर ठपका ठेवला आहे. त्यांनी ३६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरला होता. कृषी विभागाने विमा कंपन्यांना बोगस पिक विमा उतरवल्या शेतकर्यांचा विमा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. बोगस पिक विमा उतरवलेल्या शेतकर्यांचा विमा रद्द करण्यात आल्याची माहिती नाशिकचे उपसंचालक कृषी अधिकाऱ्यांनी दिला आहे.

शासनाला चुना लागता लागता

कृषी विभागाच्या पडताळणीनंतर सरकारच्या तिजोरीचा कोट्यवधी रूपयांचा भुर्दंड वाचला. बोगस पिक विमा उतरवणाऱ्यांमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आकडा सर्वाधिक असल्याचं कृषी विभागाच्या निदर्शनास आले आहे. कमी क्षेत्रावर लागवड झालेली नसल्याचा शेतकर्यांनी न कळवल्याने ही बाब समोर आली. बोगस पिक विमा चा प्रकार उघडकीस आल्यानंतर येणाऱ्या काळात कृषी विभाग पिक विमा कंपन्यांच्या माध्यमातून उडउ सेंटरला भेटी देणार आहे. कृषी विभाग त्यांच्या पिक विमा उतरवल्याची पडताळणी करणार आहे.

पीक विमा संदर्भात श्वेत पत्रिका काढा

धाराशिव जिल्ह्यात सुद्धा मोठा पीक विमा घोटाळा झाला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सुद्धा पीक विमा घोटाळा झाल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे पिकविम्याच्या संदर्भात श्वेतपत्रिका निघाली पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी केली आहे. सीएससीवर कारवाई करून काही होणार नाही. या योजनेतील घोटाळ्यामागे राजकारणी व्यक्ती असेल तर त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

मागच्या कृषीमंत्र्यांचा कारभार तपासा

मागच्या कृषिमंत्र्यांनी काय केलं आहे याची माहिती घ्यावी लागेल, असा चिमटा पण कैलास पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना काढला. बीड जिल्ह्यातून धाराशिव जिल्ह्यातील पिकविमा भरला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात काय सुरू आहे, यासंदर्भात तुम्हाला सगळं माहीत आहे. ज्या जमिनी गायरान आहेत किंवा शासकीय भूखंडांवर सुद्धा पिक विमा भरण्यात आला आहे. शासकीय भूखंडाची सरकारकडे माहिती नसते का? असा रोकडा सवाल त्यांनी केला. तर पीक विमा संदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची आग्रही मागणी केली.

### बनावट चलनी नोटांमध्य

यातील प्रमुख आरोपी मनिष क्षीरसागर हा पोलिसांना तेव्हापासून गुंगारा देत होता. परंतु बार्शी नाक्यावरील डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्लयामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले.

परंतु पुणे येथे अशा प्रकारच्या बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासा संदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यात सुरुवात केली होती. यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मणिष क्षीरसागर याचा कोर्टामार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्टल पुरवले होते. तसेच पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन औरंगाबाद येथे लपवले होते. तसेच सनी आठवले यांनी सुद्धा यातील आरोपींना शरण देऊन अक्षय आठवले मार्फत संरक्षण पुरवले होते. या काका पोलिसांना गुन्ह्यात वापरलेला मनीष क्षीरसागर याचा मोबाईल मिळाला आहे. या माध्यमातून आणखी पुरावे या गँगच्या विरुद्ध पोलिसांना मिळणार आहे.

या संपूर्ण प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंबर गोलड्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ . सहायक पोलिस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, सुषैन पवार, सचिन अलगट, यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

### पुणे शहरात

हद्दीतील ६ खासगी रुग्णालयांमध्ये २४ संशयित रुग्ण आढळून आल्याची माहिती आहे. त्यापैकी ८ रुग्णांवरती अतिदक्षता विभागामध्ये उपचार सुरू आहेत. तर २ रुग्ण व्हेंटिलेटरवर असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. सर्वांत कमी वयाचा रुग्ण २ वर्षांचा आहे, तर सर्वाधिक वयाचा रुग्ण ६८ वर्षांचा असल्याची माहिती आहे.

'गुलेन बॅरी सिंड्रोम' आजाराची लक्षणे कोणती?

हाता-पायांमधील ताकद कमी होणे. हाता-पायांना मुंग्या येणे.स्नायू कमकुवत झाल्याने वेदना होतात, संवेदना कमी होतात.गिळण्यास आणि बोलण्यास त्रास होणेधाप लागणे श्वास घेण्यास त्रास होणे चेहरा, डोळा, छाती, शरिरातील स्नायूंवर परिणाम, तात्पुरता अर्धांगवायू, श्वसनाचा त्रास होतो. हाताची बोटं, पायांना वेदना, चालताना समस्या, चिडचिड, चेहऱ्यावर कमजोरी ही प्रमुख लक्षणे आहेत. आजाराची कारणे काय?

'गुलेन बॅरी सिंड्रोम' हा विषाणूमुळे होणारा संसर्ग, ऑटो-इम्युन डिसीज, एखादी मोठी शस्त्रक्रिया होणे किंवा मेंदूशी संबंधित आजार, अशा विविध कारणांमुळे 'गुलेन बॅरी सिंड्रोम' हा आजार होऊ शकतो. या आजाराने बाधित असलेल्या रुग्णांची प्रतिकारशक्ती मज्जातंतूवर आघात करते. त्यामुळे हात-पायांमधील ताकद नष्ट होते आणि शारिरीक हालचालींवर मर्यादा येतात. या आजाराचे निदान करण्यासाठी स्पायनल फ्लुईडची चाचणी केली जाते. यामुळे रुग्णाला अर्धांगवायू (पॅरालिसीस) येऊ शकतो. तीन-चार आठवडे उपचार घेतल्यावर ९५ टक्क्यांहून अधिक रुग्ण बरेही होतात.

दरम्यान, शहरातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये- १०, सह्याद्री (डेक्कन)- १, भारती रुग्णालय- ३, काशीबाई नवले रुग्णालय- ४,पूना हॉस्पिटल- ५ आणि औंधमधील अंकुरा हॉस्पीटलमध्ये १ अशा रुग्णांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या आजाराचे ८ संशयितांपैकी रुग्णांचे नमुने तपासण्यासाठी एनआयव्ही पाठविण्यात आले आहे. हा आजार तरुणांमध्ये होत असून या आजाराला जास्त घाबरुन न जाता काळजी घेणं महत्वाचं आहे, असे पालिकेच्या आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.